महाराष्ट्र टाईम्स, पुणे ८ ऑगस्ट २०११ पृ.क्रं. ११

विस्मृतीतील अवकाशयात्री



घेर्मन टिटोव्ह

(जन्म : ११ सप्टेंबर १९३५ मृत्यू : २० सप्टेंबर २०००)

अंतराळात जाणारा पहिला अवकाशवीर म्हटलं की आपोआप रशियाच्या युरी गागारीनचं नाव घेतलं जातं. मात्र, युरीपाठोपाठ अवकाशसफरीवर जाऊन पृथ्वीला तब्बल सतरावेळा प्रदक्षिणा घालणार युरीचाच देशबांधव घेर्मन टिटोव्ह मात्र कधीच प्रसिद्धीच्या झोतात आला नाही... खर तर पहिलं तर पहिला अवकाशवीर म्हणून टिटोव्हची निवड करण्यात आली होती. मात्र, ऐनवेळी ही माळ त्याचा मित्र आणि प्रतिस्पर्धी गागारिनच्या गळ्यात पडली आणि इतिहासाच्या पानात तो अजरामर झाला.

१२ एप्रिल १९६१ रोजी गागारिन अवकाशात टाकलेले पहिले पाऊल सुमारे १०८ मिनिटांचे होते; पण त्याच्यापाठोपाठ म्हणजे ६ ऑगस्ट १९६१ रोजी 'व्होस्टॉक २' या यानातून अवकाशसफरीला गेलेला टिटोव्ह हा सुमारे पंचवीस तास अंतराळात होता. टिटोव्हच्या या झाकोळलेल्या कामगिरीला नुकतीच पन्नास वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने ऐतिहासिक क्षणांवर टाकलेला दृष्टीक्षेप...

- अंतराळ्यानात संपूर्ण एक दिवस मुक्काम ठोकलेला पहिला व्यक्ती आणि पृथ्वीच्या कक्षेचा फोटो घेण्याचा मान अर्थातच घेर्मन टिटोव्हकडेच आहे.
- तसेच, अंतराळात आजारी पडण्याचाही मानही त्याचाच..
- अंतराळात प्रवेश करणारा सर्वात अल्पवयीन अंतराळवीर म्हणूनही तो गणला जातो.
- अनेक विक्रम नावावर नोंदविणाऱ्या टिटोव्हचा २००० मध्ये हृदयविकाराने मृत्यू झाला. २०११ मध्ये गागारीनच्या अंतराळप्रवेशाचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्यात आला; पण टिटोव्हची मात्र उपेक्षाच झाली.
- मात्र, काही अंतराळप्रेमींनी याचे भान ठेवत दक्षिण सायबेरियाच्या अल्ताई प्रदेशातील पोल्कोव्निकोवो या टिटोव्हच्या मूळ गावी संग्रहालय उभारण्याची योजना आखली असून, तेथे माजी अंतराळवीर आणि टिटोव्हची पत्नी तमाराला उपस्थित राहण्याची विनंती करण्यात येणार आहे.



आपला सहकारी आणि देशबांधव युरी गागारीन याच्यासमवेत एका निवांतक्षणी घेर्मन टिटोव्ह (डावीकडे). या दोघांचे छायाचित्र असलेले पोस्ट तिकीटही प्रसिद्ध करण्यात आले होते.